सत्यमेव जयते

# शुल्क नियामक प्राधिकरण

महाराष्ट्र विनाअनुदानित खाजगी व्यावसायिक शैक्षणिक संस्था
(प्रवेश व शुल्क यांचे विनियमन)
"शिक्षण-नव्हेव्यवसाय-ज्ञान यज्ञ"

शासकीय तंत्रनिकेतन इमारत,
रुम नं. ३०५, ३ रा मजला, खेरवाडी,
बांद्रा, मुंबई-४०००५१

E-mail: fra.govmh@gmail.com / secfra.mu-mh@gov.in
Website: www.sssamiti.org
दुरध्वनी : ०२२ - २६४७०४६३

क्रमांकः शुनिप्रा/१५७०/२०१८

दिनांकः १६ नोव्हेंबर, २०१८

## नोटीस

**वाचाः** शासन निर्णय, उच्च व तंत्र शिक्षण विभाग, क्र. ईबीसी-२०१८/प्र.क्र. ३२६/तांशि-४ दि. ३० ऑक्टोबर, २०१८

उपरोक्त नमूद दि. ३० ऑक्टोबर, २०१८ च्या शासन निर्णयान्वये महाराष्ट्र विनाअनुदानित व्यावसायिक संस्था (प्रवेश व शुल्क यांचे विनियमन) अधिनियम, २०१५ चे कलम २२ मधील तरतूदीचा वापर करुन शासनाने, राज्यातील तंत्रशिक्षण संचालनालयाच्या अधिपत्याखालील ज्या विनाअनुदानित व कायम विनाअनुदानित अभियांत्रिकी व तंत्रज्ञान पदविका, औषधनिर्माणशास्त्र पदविका व हॉटेल व्यवस्थापन व खाद्यपेय व्यवस्था तंत्रज्ञान पदविका अभ्यासक्रमांचे शैक्षणिक वर्ष २०१८-१९ पर्यंतचे शुल्क निर्धारण, शुल्क नियामक प्राधिकरणाने केले आहे अशा संस्थांनी शैक्षणिक वर्ष २०१९-२० वा त्या पुढील कालावधीकरीता अधिक शुल्काची मागणी केल्यास केवळ अशा संस्थांचे शुल्क निर्धारण, शुल्क नियामक प्राधिकरणाने करण्याबाबतचे आदेश निर्गमित केले आहेत.

सदर आदेशानुसार उपरोक्त नमूद पदविका अभ्यासक्रम असणाऱ्या विनाअनुदानित व कायम विनाअनुदानित संस्थांनी शैक्षणिक वर्ष २०१९-२० करीता अद्यापपर्यंत शुल्क निर्धारणाचे प्रस्ताव शुल्क नियामक प्राधिकरणास सादर केलेले नसल्यास त्यांनी ते दि. ३० नोव्हेंबर, २०१८ पूर्वी कोणत्याही परिस्थितीत प्राधिकरणाकडे प्रचलित पध्दतीनुसार सादर करावे.

मा. अध्यक्ष, शुल्क नियामक प्राधिकरण यांचे आदेशानुसार,

अवर सचिव,
शुल्क नियामक प्राधिकरण, मुंबई